PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 4, ISSUE 1

# डॉ. आंबेडकर आणि धम्म क्रांतीची चळवळ - एक चिंतन

**प्रा. डॉ. कांबळे गोविंदराव शंकरराव**
सहाय्यक प्राध्यापक
रयत शिक्षण संस्थेचे,
आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन,
ता. सातारा, जि. सातारा. ४१५००१
महाराष्ट्र भारत

निलंबराच्या अनंत क्षितीजावर तथागताचे मानसमंदिर प्रज्वलीत करणाऱ्या मानवतेच्या ह्दयास कोटी कोटी प्रणाम. जगात महामानवाच्या रुपातच जन्म घ्यावा लागतो. म्हणूनच पुढे तो आपल्या गुणसंपन्न व्यक्तिमत्वाने आणि महान कर्तृत्वाने महामानव सिध्द होतो. जगाच्या अशा नियमानुसारच दि.१४ एप्रिल, १९८१ साली मध्यप्रदेशात महू येथे महाराष्ट्रीय पिता रामजी मालोजी सकपाळ (आंबवडेकर) व माता भीमाबाई यांच्या पोटी चौदावे रत्न महामानवाच्या रुपात डॉ. भीमराव यांचा जन्म झाला.

विश्वभूषण, भारतरत्न, महत्त्वकांक्षी, लक्ष्यवेधी, जिद्दी, निश्चयी, धोरणी, धाडशी, कष्टाळू, अभ्यासू, विचारी, स्वाभिमानी, कार्यकुशल, कर्तव्यदक्ष, अत्युच्च पदव्यांचा एकनिष्ठ साधक, बहुज्ञानी, जनहितासाठी ज्ञानाचा सदुपयोगकर्ता, लोकहितदक्ष महानायक, जागरुक जननेता, सत्याग्रही, झुंजार जनांदोलनकारी, न्यायाचा कडवा रक्षक, अन्यायाचा निर्भयशत्रू, मानवतेचा मित्र, द्रष्टा समाजसुधारक, उपेक्षितांचा उध्दारक, दलितांचा भाग्यविधाता, स्त्रियांचा कैवारी, शोषितांचा कुशल संघटक, क्रांतिप्रिय भविष्यद्रष्टा, विघातक रुढींचा विधायक विध्वंसक, अन्यायकारी परंपरांच्या विरुध्द धैर्याने लढणारा अजिंक्य योध्दा, धुरंदर राजकारणी, स्वातंत्र्यासह समता व बंधुत्व या जीवनमूल्यांचा प्रबळ समर्थक, राज्यघटनेचा श्रेष्ठ शिल्पकार, संसदीय लोकशाहीचा कट्टर पुरस्कर्ता, जागृत देशभक्त, विचारवंत संसदपटू , प्रभावीवक्ता, थोर ग्रंथलेखक, विविध ग्रंथांचा नित्यवाचक व संग्राहक, श्रेष्ठ मार्गदर्शक, थोर विधीतज्ज्ञ, जगन्मान्य विद्वान, शिक्षणतज्ज्ञ, शिक्षणसंस्थेचा दूरदर्शी संस्थापक, स्पष्टवक्ता, समाजाभिमुख पत्रकार, बहुभाषाविज्ञ भाषाप्रेमी, प्राध्यापक, प्राचार्य, उच्च आणि अत्युच्च शिक्षण घेताना ज्यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले त्यांच्या विशयी कृतज्ञता बाळगणारा कृतज्ञ, आई वडीलांचा आदर करणारा विनम्र पुत्र, बहुआयामी बहुविध गुणरुपांनी व

अलंकारांनी एक अलौकिक लोकोत्तर तेजस्वी आणि वंदनीय महामानव म्हणजे बाबासाहेब आंबेडकर तथा भीमराव रामजी आंबेडकर.

**धम्माची गरज व आवश्यकता :—**

डॉ.आंबेडकरांनी कार्ल मार्क्सच्या म्हणण्यानुसार धर्मरहित जीवन जगणे, का स्वीकारले नाही? या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या १५ ऑक्टोबर १९५६ च्या भाषणात त्यांनी दिले. दीक्षाभूमीवर जमलेल्या आपल्या अनुयायांना उद्देशून भाषण देताना धर्माला नाकारुन कार्ल मार्क्सवर हल्ला चढवीत डॉ.आंबेडकर म्हणाले मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला चळवळ आवश्यक आहे असे मी मानतो. त्या चळवळीविरुध्द मी नाही. मानसाची आर्थिक उन्नती व्हावयास पाहिजेच मनुष्याला शरीराबरोबर मनही आहे. म्हणून दोन्हींचाही विचार करावयास हवा. मनाचा विकास झाला पाहिजे. ज्या देशांतील लोक अन्नाशिवाय माणसाचा सुसंस्कृत मनाशी संबंध ठेवण्याचे मला काहीच प्रयोजन नाही. जनतेशी संबंध ठेवताना, माणसाचे शरीर जसे निरोगी पाहिजे, तसे शरीर सुदृढ होण्याबरोबर मनही सुसंस्कृत होण्यासाठी माणसाच्या जीवनात धर्माला अनन्य साधारण महत्त्व दिलेले आहे. समताप्रधान आणि व्यक्ती व समाज यांचे कल्याण करणाऱ्या धर्मावर नितांत प्रेम करणारे महामानव होते!


धर्म म्हणजे काय? हे समजावून सांगताना डॉ.आंबेडकर म्हणाले धर्माच्या अनेक व्याख्या आहेत. ज्याने सर्व प्रजेचे धारण होते तोच धर्म. हीच खरी धर्माची व्याख्या होय. समाजाच्या धारणे करिता घातलेली बंधने म्हणजेच धर्म, हीच माझी देखील धर्माची कल्पना आहे. समाजाच्या योग्य धारणेकरिता समाजाची बंधने कशी असावीत हा प्रश्न शिल्लक राहतोच. व हा प्रश्न धर्माच्या व्याख्येपेक्षा फार महत्त्वाचा आहे. ज्या बंधनांनी समाजातील सर्व प्रजेची धारणा होऊ शकते ती बंधने कशी असावीत. म्हणजे खऱ्या धर्माचे स्वरुप कसे असावे याचा विचार करताना समाज आणि व्यक्ती यांचा तात्विकदृष्ट्या संबंध काय व कसा असावा. यावरुन असे म्हणता येईल की धर्म माणसासाठी नसून माणूस धर्मासाठी आहे असेच म्हणावे लागेल, म्हणून मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी धर्माची आवश्यकता आहे.

**धर्मांतरामुळे झालेले परिवर्तन :—**

रविवार दिनांक १४ ऑक्टोंबर १९५६ रोजी डॉ.बाबासाहेब तथा भीमराव आंबेडकर यांनी हिंदू धर्मातील अस्पृश्यतेची जोखड भिरकावून मानवतावादी, समतावादी बौध्द धर्माची दीक्षा घेतली. सोबत पाच लाख अनुयायांनी देखील दीक्षा घेतली. जगाच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढी प्रचंड जनता धर्मांतर करीत असल्याची बाब आहे.

हिंदू समाजात अस्पृश्यांकरिता समता मुळीच नाही, हे सांगत असताना डॉ.आंबेडकर म्हणाले होते अस्पृष्यता ही मूर्तिमंत असमानताच आहे. एका माणसाला दुसऱ्या माणसाने न शिवण्याइतकी पतित लेखण्याची प्रथा हिंदू धर्माखेरीज आणि समाजाखेरीज अन्यत्र कोठेही सापडेल काय? तुम्ही हिंदू धर्मात राहिल्यामुळे जातिनिष्ठ समाज व्यवस्था निर्माण झाली आहे. हिंदू धर्मामुळे जातिनिष्ठ समाज व्यवस्था निर्माण झाली आणि तिचा आणखी एक दुष्परिणाम म्हणून अस्पृश्यांमध्येही जातिभेद व अस्पृश्यता पाळली जाते. जातिभेद ही एक मानसिक स्थिती आहे. एक मानसिक व्यथा आहे. आपल्या मनातील जातिभेद व अस्पृश्यता नाहीशी करावयाची असल्यास आपण धर्मांतर करणे हा एकच उपाय आहे.

धर्मांतरामुळे नवदिक्षित बौध्द समाजाची सामाजिक वाङ्मयीन, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक राजकीय आणि शैक्षणिक क्रांती मोठ्या प्रमाणावर घडून आली.




धर्मांतरामुळे सामाजिक स्थितीत क्रांतिकारी परिवर्तन घडून आले. दलित जनतेची आत्मिक समाधान देणारी घटना म्हणजे धर्मांतर. बौध्द धर्म हा विश्वधर्म आहे. त्यामुळे हिंदू समाजाचे नुकसान काही झालेले नाही तर समाजात विश्व शांतता, मानवता, एकता, अबाधित राखण्यासाठी धर्मांतराने फार मोठे योगदान भारत भूमीस दिल्याचे दिसून येते.

भारतातील अस्पृश्यतेचा अंत धर्मांतरामुळे झालेला आपणास दिसून येतो. त्यामुळे आज बौध्द समाज शिक्षण, राजकारण, समाजकारण, अर्थकारण या क्षेत्रामध्ये आघाडीवर असल्याचे चित्र दिसून येत आहे.

धर्मांतराने गुलामगिरी सोडून मानाचे जीने बौध्दधर्मीय लोक जगताना आपणास दिसून येत आहे. धर्मांतराने लाखो बौध्द जनतेचा स्वाभिमान उंचावलेला आहे. आज कोणत्याही क्षेत्रात बौध्द समाज आपणास इतर जनतेच्या मानाने मागे राहिलेला नाही ही धर्मांतराची चळवळ संपूर्ण भारतात आज असलेली दिसून येते.

स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय यावर आधारित जीवन जगण्यास साह्य धर्मांतराने बहाल केले आहे. एकूणच बौध्द समाजाचा विकास घडवून आणण्यास धर्मांतराने केलेली क्रांती अवर्णनीय अशीच आहे.

अस्पृष्यता नष्ट करुन व स्पृश्यास्पृश्य भेद नष्ट करुन भंगलेला व दुर्बळ झालेला हिंदू समाज अभंग, अखंड, संघटित व सामर्थ्यवान व्हावा, असाच हेतू डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा धर्मांतरा पाठीमागचा असलेला या सर्व माहिती वरुन दिसून येतो.

**धर्मांतराचे परिणाम :–**

बौध्द धम्म स्वीकारामुळे नव–दिक्षित बौध्दांच्या मनात मोठी वैचारिक क्रांती झाली. त्यांच्यात मोठा मानसिक बदल झाला आहे. या बदलाला विचाराचा पक्का पाया आहे. श्रध्देचा आधार आहे, आणि आपल्या नेत्यावरील अढळ विश्वासाचा भागही आहे.

१. **मानसिक परिवर्तन :–** बौध्द धम्म स्वीकाराचा नव–दिक्षित बौध्द जनावर फारच चांगला व खोल असा परिणाम झाला. त्यांच्या मनात मोठे परिवर्तन झाले. हे मानसिक परिवर्तन होय. मी बौध्द धम्माचा स्वीकार केला आहे. मी आता बौध्द आहे. मी महार नाही. अस्पृष्य नाही, हिंदू नाही. मी आता माणूस झालो. मी वरीष्ठ हिंदूच्या बरोबरीचा माणूस झालो. मी सवर्णासमान झालो. मी आता हीन नाही. कनिष्ठ नाही, माझ्या बौध्द धम्म स्वीकाराबरोबर माझे अस्पृश्यतेच्या शृंखला तटातट तुटून पडल्या. आता मी इतरांसारखा माणूस झालो. मी आता समता, स्वतंत्रता, बंधुता या तत्वांच्या जगात आलो. मी आता स्वतंत्र भारताचा स्वतंत्र नागरिक झालो आहे.

२. **शहरात झालेले परिणाम :–** शहरातील पद–दलितांपैकी ज्यांनी बौध्द धम्माची दीक्षा घेतली ते आता आपण बौध्द धम्माचे म्हणून सांगतात. तसेच हिंदूंच्या सण समारंभाचा त्याग केला, देव–देवतांचा त्याग, त्याचप्रमाणे शहरातील मंडळी वर्षाकाठी आपल्या गावी मरीआई, ताईआई, काळुआई, म्हसोबा, खंडोबा, आदी देव–देवतांची सालाची जत्रा

करण्यासाठी जात होती पण आता दीक्षा घेतल्यावर बौध्द जनांनी जाणे वर्ज्य केले आहे. जोतिष्याकडे जाऊन वेळ, काळ, तिथी, मिती पाहणे हेही शहरातील बौध्द जनांनी कायमचे सोडले आहे. शहरात बौध्दजनांना धार्मिक व सांस्कृतिक कार्याच्या दृष्टीने बौध्द जनांचे वेगवेगळ्या संस्था आहेत.

३. **ग्रामीण भागात झालेला परिणाम :–** बौध्द धम्माच्या स्वीकारानंतर खेडोपाडी राहणाऱ्या बौध्दांच्या जीवनात क्रांतीकारक बदल झालेला दिसतो. हा बदल अतिशय हितकारक, प्रगतीकारक आहे. रुढीच्या, शास्त्रांच्या, हिंदू धर्माच्या दास्यत्वात खितपत पडलेल्या बंदिस्त गुलामाला आपण आता मुक्त झालो, आपण स्वतंत्र झालो असे मनोमन वाटते. इतरांच्या बरोबर मानवी हक्क प्राप्त झाले असे वाटू लागले. स्पृश्यवर्ग व आपण आता समान झालो. धनी—मालक, गुलाम—सेवक—चाकर हे नाते नष्ट झाले. दोघेही समान, दोघेही सारखेच असे नव—दीक्षित बौध्दांना वाटू लागले.

शेकडो वर्षांपासून, पिढ्यानपिढ्या भाकरीच्या तुकड्यासाठी जी हीन प्रतीची ओंगळ, घाणेरडी, हलकी कामे खेडोपाडी अस्पृश्य वर्गाला करावी लागत ती कामे बंद केली, त्या कामांत गावची झाडलोट करणे, त्याच बरोबर गावचे देशमुख—देशपांडे, पाटील—कुलकर्णी आणि वाणी—उदमी यांच्या वाड्यांत, घरी—दारी झाडलोट करणे हे त्यांनी बंद केले. तसेच गावात लहान मोठी कामे, मेलेली जनावरे गावाच्या बाहेर लांब ठिकाणी ओढून टाकणे बंद केले. गावातील मेलेल्या मढ्याच्या सरणाची लाकडे, गोवऱ्या स्मशानभूमीत टाकणे बंद केले. ही सर्व कामे बंद करुन डॉ. बाबासाहेबांच्या सुधारणेच्या चळवळीपासून या आजच्या बौध्द समाजाचा शिक्षण घेण्याकडे कल आहे.

**सद्य:स्थिती :–**

२१ व्या शतकातील बौध्द बांधवांची सद्य:स्थिती म्हणावी एवढी म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दीक्षाभूमीवर संपूर्ण भारत बौध्दमय करीन ही गर्जना केवळ घोषणा राहिली आहे काय? याचे निटसे उत्तर मिळत नाही? कायद्याने पुष्कळ हक्क दिले असले तरी अजूनही खेडी पाडी सवलतीच्या भितीपोटी पूर्वीची जात महार शाळेतील रजिस्टरला नोंदवली जाते. तसेच आजही सवर्ण समजल्या जाणाऱ्या समाजाने बौध्दांना सामाजिक, मानवतावादी, समान वागणूक दिलेली शंभर टक्के दिसत नाही. खेडोपाडी आजही धर्माच्या नावावर मोठ्या प्रमाणात राजकारण केले जाते. प्रत्येक क्षेत्रात बौध्द समाजाची हेटाळणी केली जाते. समानतेची वागणूक देण्याचे कटाक्षाने टाळले जाते. नोकरीत फक्त आरक्षणातील जागेची भरती केली जाते. अनरक्षित पदावर खुल्या वर्गातून बुध्दीवान बौध्द तरुणांना संधी दिली जात नाही. त्यामुळे सवलती मिळविण्यासाठी बौध्द की महार या चक्रातच मोठ्या प्रमाणावरील जनता अडकलेली दिसत आहे. आजही अंधश्रध्दा, भूत भानामती, देव या पगड्यात

लाखो दलित बांधव अडकलेले आहेत. धर्मांतराचा मुख्य हेतू साध्य झालेला आपणास म्हणता येणार नाही. हे परिवर्तन घडून येणे आजच्या काळाची नितांत गरज आहे असे वाटते.

**निष्कर्ष :—**

1. धर्मांतरामुळे मानवतावादी जीवन जगणे सुसह्य झाले.
2. शिक्षण हा मानवाचा हक्क आहे याची जाणिव झाली.
3. धर्मांतरामुळे राहणीमान उंचावले.
4. समाजिक दर्जात सुधारणा झाली.
5. गुलामगिरीतून सुटका झाली.
6. स्पृश्यास्पृश्य भेदाभेद काही प्रमाणात दूर झाला.
7. जातीभेद धर्मभेदाचे चटके कमी होण्यास मदत झाली.
8. आर्थिकस्थितीत सुधारणा झाली.
9. सवर्णांच्या चाकरीतून मुक्तता.
10. माणूस म्हणून जगण्याचा आनंद मिळाला.

## संदर्भग्रंथ :—

१. अत्रे आचार्य (२०१०) दलितांचे बाबा, मुंबई : परचुरे प्रकाशन.

२. उन्मेष (२००९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पुणे : चैत्राली प्रकाशन.

३. खरात शंकरराव (२०११) डॉ. बाबासाहे आंबेडकरांचे धर्मांतर.

४. गायकवाड ज्ञानराज काशीनाथ (२०११) महामानव, नवी मुंबई : राजवंश पब्लिकेशन.

५. चंद्रमोली, व्ही. (अनुवाद) गोडबोले, वि.ज. (१९९३). डॉ.बाबासाहेब आंबेडकर — एक व्यक्ती. पुणे : दास्ताने रामचंद्र आणि कं.

६. तळवटकर घन:शाम, चिटणीस म. भि., रेगे शां. श. (अनु.) (२००६) भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म. केळझर : सद्धमादित्य प्रकाशन.

७. पवार ज. वि. (२००९). आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, औरंगाबाद : कौशल्य प्रकाशन.